## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर-३८७/२०२१

**अपिलार्थी, श्री. भिष्म भट्ट**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक,**
उप अधिक्षक भुमि अभिलेख वाडा यांचे कार्यालय , ता.वाडा, जि.पालघर

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप अधिक्षक,**
उप अधिक्षक भुमि अभिलेख वाडा यांचे कार्यालय, ता.वाडा, जि.पालघर

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १८.५.२०२२**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १५.१०.२०२० | ---- | २१.११.२०२० | ----- |

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.१.२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.५.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले की, त्यांच्या दिनांक १५.१०.२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये, "*Investigation and area Verification Reports of my land in Village amagaon, Taluka Wada, palghar.*" अशा प्रकारची माहिती मागीतली होती. सदर माहिती त्यांना मिळालेली नाही. यास्तव द्वितीय अपिल दाखल केले आहे.

तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी असे सादर केले की, त्यांनी दिनांक २७.११.२०२० रोजी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिली आहे.

प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१२.१.२०२१ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक उप अधीक्षक भूमी अभिलेख वाडा यांनी अपिलदार यांना उपलब्ध असलेली माहिती ७ दिवसांत टपालाने अथवा समक्ष विनामुल्य पुरविण्यात यावी असा निर्णय दिलेला आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी दि.२७.११.२०२० रोजी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती देण्यात आल्यामुळे, अपील निकाली काढण्यात येत आहे.

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ मे, २०२२